संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# तळीरामांसाठी समाजहिताला तिलांजली

**काही** महिन्यांपूर्वी राज्यसरकारने ऑनलाईन दारू विक्रीचा प्रस्ताव तयार केला होता म्हणजेच लोकांना आता भरपूर दारु उपलब्ध करून देण्याचा सरकारचा विचार होता. परंतु लोकांच्या प्रचंड टीका आणि विरोधापुढे सरकारला झुकावे लागले आणि अशी कोणतीही योजना नसल्याचे थेट मुख्यमंत्र्यांना जाहीर करावे लागले. सरकारवर अशी वेळ का आली तर दारूसारखे व्यसन जर घर कुटुंब उद्ध्वस्त करत असते आणि तीच दारू थेट घरापर्यंत उपलब्ध करून देण्याची सरकारी योजनाच असेल तर ते आणखीनच दुर्दैवी ठरले असते. दारू हे व्यसन आहे. ते शरीराला, समाजाला घातक आहे. हे माहीत असूनही केवळ समाजातल्या काही तळीरामांचा शौक पुरवण्याकरीता आणि त्यातून मिळणारे उत्पन्न लाटण्याकरीता सरकार दारू विक्रीला मान्यता देत असते. परंतु या दारूव्यसनामुळे गेल्या काही वर्षांत रस्ते अपघातांचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढले आणि मग मध्यंतरीच्या काळात सर्वोच्च न्यायालयाला असा आदेश द्यावा लागला की, महामार्गांच्या पाचशे मीटर परिसरात दारूची दुकाने असता कामा नयेत. हा निर्णय देशभरासाठी होता आणि स्वाभाविकपणे महाराष्ट्रालाही तो लागू झाला. त्यामुळे राज्यातील महामार्गावर ठाण मांडून बसलेली तीन हजार दुकाने बंद करावी लागली. त्याचा तितकाच सकारात्मक परिणामही दिसून आला. कारण ही दुकाने बंद झाल्याने महामार्गांवर गाड्या थांबवून दारू पिणाऱ्यांचे म्हणजेच दारू पिऊन गाडी चालवणाऱ्यांचे प्रमाणही घटले. अपघातांच्या संख्येत लक्षणीय घट झाली. दोन वर्षापूर्वीचे महामार्गांवरील अपघातांचे प्रमाण आणि गेल्या वर्षभरातील अपघातांचे प्रमाण यामध्ये ही तफावत प्रकर्षाने लक्षात येते. हा सगळा सकारात्मक परिणाम समोर असताना सरकारने आता पुन्हा ही तीन हजार दुकाने सुरु करण्याच्या दिशेने पाऊल उचलले आहे. कारण या तीन हजार दुकानदारांच्या वतीने न्यायालयात याचिकाही दाखल केली गेली. न्यायालयाने या लोकांचे म्हणणे राज्य सरकारने ऐकून घ्यावे आणि कोणती सुधारणा करता येईल हे पाहण्याचे निर्देश दिले होते. त्या निर्देशानुसार आता महानगराजवळच्या ग्रामपंचायत किंवा नगरपालिकांच्या लोकसंख्येनुसार महामार्गापासून एक किलोमीटर अंतरावर ही दारूदुकाने उघडण्याचा आदेश दिला गेला आहे. जिल्हाधिकाऱ्यांना तशा सूचनाही दिल्या गेल्या आहेत.

### दारु आणि वाढते अपघात

सर्वोच्च न्यायालयाचा तो निर्देश शिरसावंद्य मानून राज्य सरकारने जी तत्परता दाखवली आहे तीदेखील आश्चर्यचकित करणारी म्हणावी लागेल. खरे तर ज्या प्रमुख कारणांसाठी महामार्गाला लागून असलेली ही दारूची दुकाने बंद करण्याचे निर्देश दिले गेले. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. केवळ बारमालक किंवा दुकानदारांचे भले करण्याकरीता आणि आपलेही उत्पन्न अबाधित ठेवण्याकरीता जर या पळवाटा शोधल्या जात असतील तर समाजहिताला तळीरामांसाठी तिलांजली देण्यासारखा तो प्रकार ठरतो. एकीकडे देशाच्या अनेक भागात दारूबंदीची मागणी जोर धरत आहे. बिहारमध्ये संपूर्ण राज्यात दारुबंदी लागू केली आहे. तामिळनाडूमध्ये महिला संघटनांनी त्याविरोधात आवाज उठवलेला आहे. आंध्रप्रदेशातही बऱ्यापैकी असाच विरोध पाहायला मिळतो. आपल्या महाराष्ट्रातच चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदी लागू करण्याचा निर्णय अंमलात आलेला आहे. ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय बंग यांनी या दारुबंदीचे स्वागत करून ती संपूर्ण देशभर लागू करण्याची मागणीही केली होती. कारण जी गोष्ट केवळ व्यसन म्हणून केली जाते आणि जे व्यसन शारीरिक, मानसिक, सामाजिक अशा अनेकदृष्टींनी धोकादायक ठरते. त्याला कोणत्याही पध्दतीने प्रोत्साहन मिळणार नाही याची दक्षता राज्य सरकारने घ्यायला हवी. बारमालक किंवा दारुदुकानदार यांच्या धंद्यावर गदा येत असल्याने या ना त्या मार्गाने आपला हेतू साध्य करून घेण्याचा प्रयत्न करतीलच. पण निदान रस्ते अपघातांमधले दारुपायी जाणारे हजारो बळी रोखण्याकरीता काही कठोर उपाय आवश्यकच ठरतात. त्यातही महामार्गालगतच्या दारु दुकानबंदीमुळे जर अपघातांमध्ये घट झाली असेल म्हणजेच त्याचे निष्कर्ष स्पष्टपणे समोर आलेले असतील तर महामार्गालगतचा जीवाशी खेळ करणारा धंदा कायमचा बंद ठेवणे केव्हाही योग्यच ठरणार आहे.

### निदान तेवढी तरी साधनशुचिता पाळा

महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यामध्ये राज्य सरकारकडून त्यासंदर्भात ठोस किंवा समाजहित साधणारा निर्णय होऊ नये याचे कोणालाही आश्चर्य वाटू शकते. अगदी महात्मा ज्योतिबा फुलेंनीसुध्दा या व्यसनाला कडाडून विरोध केला होता. गेली पन्नास वर्षे दारुबंदीची चळवळ महाराष्ट्रात वेगवेगळ्या पध्दतीने राबवली गेली. परंतु सरकारकडून कधीही दारुबंदीसाठी पुढाकार घेतला गेल्याचे आठवत नाही. उलट दारु दुकानांची लायसन्स विक्रीला काढली जातात. लाखो लोकांची दलाली राजकारणी आणि अधिकाऱ्यांकडून घेतली जाते. दहा वर्षापूर्वीची राज्यातील दारुदुकानांची संख्या आणि आताची संख्या यामध्ये कमालीचा फरक पडलेला आहे. ही संख्या दुपटीच्यावर गेल्याचे स्पष्टपणे दिसते. यावरून सरकारला राज्यात दारुबंदी असावी असे प्रामाणिकपणे वाटत नाही हे स्पष्ट होते. पिणारे त्यांच्या कर्माने मरतात आणि अशा मरणाऱ्यांच्या टाळुवरचे लोणी सरकार खात राहाते. अशीच आज वस्तुस्थिती आहे. या जनविरोधी प्रवृत्तीचा जेवढा निषेध करावा तेवढा थोडाच ठरतो. आणि या सगळ्या कृतीतून सरकार समाजहित जोपासण्याकरीता सभ्यपणाचे संवर्धन करू शकत नाही. किंबहुना तसे सौजन्यदेखील दाखवू शकत नाही. दारुदुकानदारांप्रती असलेली त्यांची ही सहानुभूती कोणाचेही मन विषण्ण करणारी ठरते. आम्ही तर सरकारला असे आवाहन करतो की सर्वोच्च न्यायालयाने जरी बारमालक किंवा दारुदुकानदारांचे म्हणणे ऐकून घेण्याचे सूचवले असले तरी सध्याच्या रस्ते अपघातांचे प्रमाण लक्षात घेऊन महानगरांलगतच्या या यमदुतांना अजिबात परवानगी देऊ नये. निदान तेवढी तरी साधनशूचिता पाळण्याचे भान ठेवावे.